Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

Impact Factor – 7.139 ISSN – 2319-8648

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# Current Global Reviewer

Multidisciplinary International Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

**Aug. 2020 Special Issue - 131**

**Chief Editor -**

**Arun B. Godam**

| Current Global Reviewer Multidisciplinary Research Journal | | ISSN- 2319-8648 |
|---|---|---|
| Impact Factor - (SJIF) – 7.139 Issue –131 | Aug. 2020 | Peer Reviewed |

**Published on Aug. 2020**

**Editorial Office Address :**

Khadgaon Road, Kapil Nagar, Latur, Dist. Latur 413512 (M.S.) India

Contact- 8149668999

Email-

hitechresearch11@gmail.com

Publisher

**Shaury Publication**

Kapil Nagar, Latur

Contact- 8149668999

**Rs. 400/-**

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. ChittaRanjan Panda**
P.G. Deptt. Of Odia
Shailabala Women's Autonomous College , Cuttack – (Orissa)

**Dr. U.T. Gaikwad**
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

**MaimanatJahanAra**
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr M.U. Yusuf**
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Auranbadad, Dist. Aurangabad

**Dr. Hanumant Mane**
R.Guide& Head,
Dept. of Marathi,
Shivchatrapati College,
Kalam, Dist. Osmanabad(M.S.)

**B.J. Hirve**
Dept. of botany
VasantMahavidyalaya,
Kaij, Dist. Beed. (M.S.)

**Dr. PravinDiddeshwarShete**
Dept. of Zoology, Maharashtra UdaygiriMahavidyalaya, Udgir,
Dist. Latur

**DrU.V.Panchal**
H.O.D, Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Pro. S.B. Karande**
Dept. of Economics,
ShriBhausahebVartak College,
Borivali (W), Dist. Mumbai.

**Dr. SachinKadam**
Dept. of Hindi
Nagarpalika Art D.J. Malpani Comm. & B.N. Sarda Sci. College,
Sangmner, Dist. Ahmadnagar (M.S.)

20. व्यवसायाचे समाजिक उत्तरदायित्त्व 56
प्रा.डॉ.बाजीराव माणिकराव पाटील
21. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेशैक्षणिक कार्ये 58
श्री.डॉ.सुदर्शन व्यंकटराव सोनवणे
22. "साहित्य में वैश्वीकरण की प्रासंगिकता" (विशेष संदर्भ - ममता कालीयाका दौड उपन्यास) 60
प्रा.डॉ.जाधव के.के.
23. स्वच्छभारतअभियानप्रभाव एवंकठिनाईयाँ 62
श्रीमतीटीनाजोशी
24. सेंद्रिय शेतीची अपरिहार्यता 69
प्रा.बी. एस. जोगदंड
25. धारकर पवार घराण्यातील उदाजीराव पवारांचे कार्य 72
प्रा.डॉ.सुनिल रजपूत
26. पंडितजवाहरलालनेहरू यांचेआलिप्ततावादी धोरणआणिपंचशीलतत्वे 74
डॉ. संतोषबाबुरावकु–हे
27. दलित स्त्री और दोहरा अभिशाप 76
डॉ. मोहनन वी टी वी
28. सामाजिकसंशोधन आणि अर्थशास्त्रीयसंशोधन पध्दती एक अभ्यास 79
डॉ.सुरेश भा.ढाके
29. 'दशावतारचरितम्' के महाकाव्यत्वमेंआचार्य क्षेमेन्द्रका पाण्डित्य' 82
महेष दत्त शर्मा
30. मौलानाअबुलकलामआझादयांचेराष्ट्रवादासंबंधीविचार 86
पठाणअब्दुलगफ्फारजहाँगीर
31. निराला और मुक्तिबोध का हिन्दी काव्य पर प्रभाव 88
डॉ.ढाणकीकर शोभा नारायणराव
32. महाकवीअश्वघोष लिखितमहाकाव्यातीलस्त्रीविषयकविचार 91
श्रीमती. मुदलियारशकुंतलारामन
सौ. सातपुते माधुरी सुनील
33. हिन्दी स्त्रीवादी साहित्य में विद्रोह का स्वर 94
डॉ. शेषराव लिंबाजी राठोड
34. उपन्यास 'तमस' में की सम्परदायिकजदोजहदमेंसगाजऔर संस्कृतिकादोहन 97
स.प्रा.डॉ. राजेशप्रल्हादरावआरदवाड
35. विद्याधर पुंडलीक यांच्या कथाविश्वाचा विवेचक अभ्यास 101
प्रा.डॉ.सहदेव रसाळ

**Current Global Reviewer** International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7.139, Special Issue –131 | Aug. 2020 | Peer Reviewed

# विद्याधर पुंडलीक यांच्या कथाविश्वाचा विवेचक अभ्यास

**प्रा.डॉ.सहदेव रसाळ**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

**प्रास्ताविक :-**

मराठी कथाविश्वाला समृध्द करणारे लेखक अशी विद्याधर पुंडलिकांची ओळख मराठी साहित्य वर्तुळात निर्माण झाली आहे. पुंडलिकांचे कथा-लेखन सातत्याने प्रयोगशील पातळीवरून आकारास आले आहे. त्यांनी बालकांच्या विश्वाचे दर्शन घडवणाऱ्या कथा, वयोवृध्द माणसांच्या आयुष्यावर बेतलेल्या कथा, प्रेमाचे दर्शन घडवणाऱ्या कथा आणि अन्य सामाजिक वास्तवाचा वेध घेणाऱ्या कथा लिहिल्या. त्यांच्या या कथंचा विवेचक अभ्यास येथे केला जाणर आहे. त्याचबरोबर शेवटी हाती आलेल्या निष्कर्षांची मांडणी केली जाणर आहे. पुंडलिकांच्या कथा लेखनातील वेगळेपण या अभ्यासाच्या निमित्ताने शोधले जाणार आहे.

**विद्याधर पुंडलिक यांचे कथाविश्व :-**

पुंडलीक हे मराठी कथा साहित्यतील सिध्दहस्त कथा लेखक आहेत. त्यांचे 'पोपटी चौकट' (१९६२), 'टेकडीवरचे पीस' (१९६९), 'देवचाफा' (१९७९), 'माळ' (१९८०) इत्यादी कथासंग्रह प्रसिध्द आहेत. या कथासंग्रहातील कथेच्या माध्यमातून त्यांनी वेगवेगळे विषय हाताळले आहेत. त्यावरून त्यांच्यातील एका समृध्द लेखकाचे दर्शन घडते. आपल्या सभोवताली घडणाऱ्या घटना त्यांच्या कथांच्या माध्यमातून साकार झाल्या आहेत. कोणताही लेखक समाजातील प्रखर वास्तव पाहिल्यानंतर आणि अनुभवल्यानंतर त्याची मांडणी कलाकृतीच्या माध्यमातून करत असतो. ही मांडणी पुंडलिकांनी त्यांच्या एकुणच कथा वाङ्मयातून केली आहे.

'पोपटी चौकट' हा त्यांचा कलात्मदृष्ट्या संपन्न कथासंग्रह आहे. या कथासंग्रहातील एकूण बारा कथा ह्या वेगवेगळ्या विषयावर अधिष्ठित आहेत. यातील बहुसंख्य कथा बालविश्वाचे दर्शन घडविणाऱ्य आहेत. 'आजी शरण येते', 'एका मांजरीची कथा', 'डोळे', 'वॉर्ड नंबर सात' आणि 'ठिपका' या कथांचा अंतर्भात बालजगताचे दर्शन घडवणाऱ्या कथांत करता येतो. 'सावली', 'सामोरी', 'पोपटी चौकट', 'तांबूस तपकिरी नारिंगी', 'पहारा' आणि 'चकवा' या कथांच्या माध्यमातून प्रेमोचे दर्शन पुंडलिकांनी घडवले आहे. त्यांच्या एकूणच कथांनी मराठी कथा वाङ्मयात मोलाची भर घातली आहे. त्यांच्या लहान मुलांचे मनोविश्वाचे दर्शन घडविणाऱ्या कथा या विशेष लक्ष वेधून घेणाऱ्या आहेत. त्यांचा निर्देश उपरोक्त विवेचनात केला आहे त्यांची 'वार्ड नंबर सात' ही कथा उत्तम अशी कथा आहे. या कथेची उंची एकूणच कथेचा आकलनावरून निदर्शनास येते. या कथेच्या सामर्थ्याचा अंदाज प्रत्यक्ष कथाभागावरून येईल, "विनूचे लकलकचे डोळे त्या स्वप्नाभोवती रुंजी घातल्यासारखे नाचले. "आजोबा मी टारझन होणार, टारझन. जंगल का राजा! रान का बादशाहा! एकामागून एक असे पाच वाघ-सिंह आले तरी हम डरेंगे नही." असे म्हणून त्याने मांडी आणि दंड थोपटले. मान तिरकी करून नाक ओढून सिंहाची गुरगुर त्याने करुन दाखवली. त्याच्या इवल्याश मुठीने सिंहाचा जबडा त्याने दातओठ चावत फाडून दाखवला. आणि त्या झुंजीनं थकलेला टारझन अखेर धाडकन कॉटवर पडला! वॉर्डमधले सारे रोगी हसले. नानाही अगदी खळखळून हसले."[१] यावरून पुंडलिकांच्या कथेतील बालविश्वाची कल्पना येते. या कथा निर्मितीच्या निमित्ताने कथाकारांनी बाल मानसशास्त्राची एक सक्षम मांडणी केली आहे. या एकूणच कथासंग्रहाच्या निमित्ताने रागिणी वि.पुंडलीक विवेचन करतात, ""बरं, आता दुसऱ्यांदा बघू", हे म्हणाले. पण तरीही ह्यांना ते नाहीच जमलं. आणि त्यातूनच तारुण्यातील प्रीतीचा लपंडाव दाखवणारी हलकीफुलकी 'पोपटी चौकट' ही कथा निर्माण झाली. ही कथा मात्र ह्यांनी कधी नव्हे ती आठएक दिवसांत सरळपणं, त्यात फारसे बदल न करता लिहून काढली. आणि याच कथेच्या नावानं ह्याचं पहिलं पुस्तक मौज प्रकाशनानं प्रसिध्द करून खऱ्या अर्थी लेखक म्हणून ह्यांना स्वतंत्र स्थान मिळवून दिलं."[२] अशा प्रकारे पुंडलीक कथाकार म्हणून जन्मास आले. त्यांच्या कथा निर्मितीला वेगवेगळे पदर आहेत. त्याचबरोबर विषयाचे वैविध्यही आहे. 'पोपटी चौकट' या कथासंग्रहाच्या आगमनामुळे पुंडलिकांची ओळख साहित्यक्षेत्रात तयार झाली. त्यांच्या कथा लेखनातून सभोवतालच्या समाजाचा पट सक्षमपणे उभा राहतो. मृत्यूच्या वेगवेगळ्या रुपाचे दर्शन घडवणाऱ्या कथा हे त्यांच्या कथा लेखनातील वेगळेपण दर्शवतात. अशा वेगवेगळ्या विषयाची गुंफन करत त्यांचा 'पोपटी चौकट' हा कथासंग्रह सिध्द झाला आहे. या संग्रहातील उत्तमोत्तम कथांवरून पुंडलिकांच्या व्यक्तिमत्त्वात दडलेल्या सक्षम कथा लेखकाचे दर्शन घडते.

मराठी साहित्यात पुंडलिकांच्या कथेने एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांची कथा ही वेगळ्या चोकोरीतून लिहिली गेली आहे. त्यांचा दुसरा महत्वाचा कथासंग्रह 'टेकडीवरचे पीस' प्रकाशित झला. या कथासंग्रहाने स्वातंत्र्याच्या पूर्वीच्या आणि स्वातंत्र्योत्तर काळातील अनुभव विश्वाचे अविष्करण केले आहे. या संग्रहातील एकूणच कथा बहुस्तरीय विषयाची मांडणी करतात. या कथासंग्रहात एकूण तेरा कथा आहेत. या सर्वच कथा वेगवेगळ्या विषयावर बेतलेल्या आहेत. 'स्वतिक', 'मी आणि पेंडसे', 'मोनालिसा', 'भिंत', 'टेकडीवरील पीस', 'आईची सवत', 'मी येऊ?' या कथा बालविश्वाचे दर्शन घडवणाऱ्या कथा आहेत. 'विपरीत काही झालं नाही!', 'वाटा', 'ऐलतीर', 'गुप्त वाट', 'भिंत', 'वेडीवाकडी लाल रेषा' या कथांमधून मृत्यूचे वेगवेगळी रुपे, गुढ गुंजनात्मकता, मांजरप्रेम आणि बहुविध सामाजिक वास्तव यांची गुंफण करण्यात आली आहे. पुंडलीक हे कथा वाङ्मयाला संपन्न आकार देणारे बहुश्रुत कथाकार आहेत. त्यांच्या कथांमधून साकार झालेले मांजरप्रेम सर्वश्रुत आहे. त्यांना असलेल्या मांजरीबद्दलच्या आकर्षणातून मांजरप्रेमाच्या कथा आकारास आल्या आहेत. या कथासंग्रहातील 'मी येऊ?' या कथेवरुन त्यांचे मांजरप्रेम प्रकर्षाने लक्षात येते. ते असे, "दिवस जात होते. अन् काळी थकत चालली होती. हाक मारली की डोळ्यांची फट किंचित किलकिली करुन ती नुसतं क्षीणपण मिशांतून 'मँऊ'

Current Global Reviewer International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7.139, Special Issue –131 | Aug. 2020 | Peer Reviewed

म्हणायची. घराबाहेरुन आली की लांबच्या कुठल्यातरी प्रवासाहून आल्यासारखी ती थकायची. बराच वेळ आपल्या पंजात डोकं ठेकवून ती चुलीपाशी पडून असायची. मग मधूनच ती दचके. पिशवीसारखं फुगलेलं तिचं पोट धपधपे अन् दूरवर कुठंतरी पाही. तिनं असं बघितलं की अवी विचारायचा, "कुठं बघते ही बापू?" अन् थोडा गोरामोरा व्हायचा."[3] ही मांजराविषयीची आपुलकी लेखकाच्या मनात असलेल्या मांजरप्रेमाचे दर्शन घडवताना दिसते. मांजराबद्दल अगदी बालकापासून ते वृध्दापर्यंत आकर्षण असते. ज्यांना मांजर हा प्राणी आवडतो. त्या प्रत्येकाला याच्याविषयी आकर्षण असते. त्याच आकर्षणातून पुंडलिकांच्या माजंराविषयीच्या कथा जन्माला आल्या आहेत. आपल्या लेखनाच्या सामर्थ्यावर कथाविश्व समृध्द करणाऱ्या या कथाकाराबद्दल म.द.हातकणंगलेकर म्हणतात, "विद्याधर पुंडलिकांच्या कथात जुन्या, नव्या कथेची सौंदर्यस्थळे सामावली आहेत. ते जुन्या कथाकारांत नवे व नव्या कथाकरात जुने दिसू लागतात. नव्या जाणीवांतून सनातन श्रध्दास्थाने साकार करण्याची त्यांच्या कथेची धारणा आहे. बालमनाच्या व्यापाराचे जे त्यांना आकर्षण आहे त्यात कलात्मक जाणीवेची विशुध्द जात प्रकट होते. त्यांच्या आविष्कार पध्दतीच्या हळुवारपणाला अभिजात साहित्य सौंदर्याचे शांत तेज आहे."[4] या समाध्यांनी आणि सौंदर्यस्थळांनी पुंडलिकांचे कथा साहित्य नटलेले आहे. त्यांच्या साहित्यात विषयनिवडीचे सामर्थ्य लाभले आहेच पण कलाकृतीला वाङ्मयीन आकार देण्याची क्षमता आहे. त्यांच्या 'टेकडीवरचे पीस' या कथासंग्रहातील कथांचे वैविध्य पाहिल्यानंतर या संग्रहातील कथा ह्या एका कलात्मक उंचीवर जाऊन पोहोचल्या आहेत. त्यांची बालकांपासून ते वृध्दापर्यंत असलेली कथालेखनाची झेप त्यांच्या कथा लेखनाच्या सामर्थ्यांची वेगळी ओळख करून देते.

आपल्या कथा लेखन कौशल्याचे एकूण मराठी कथासृष्टीला भूरळ पाळणारे पुंडलीक कथालेखन अगदी तटस्थपणे करतात. एखाद्या विषयावरील कथा लेखन करीत असताना त्या विषयाला आणि कथेला आखीव-रेखीव रुप येईपर्यंत त्या कथेत भर घालण्याची त्यांची तयारी असते. त्यामुळे त्यांच्या कथेला जीवंतपणा येतो. अशा या बहुविध सामर्थ्यातून पुंडलिकांचे एकूणच कथा वाङ्मय फुलत गेले आहे. याचा महत्त्वाचा साक्षीदार म्हणून तिसऱ्याही कथासंग्रहाकडे पाहता येईल. 'देवचाफा' त्यांच्या हा तिसरा कथासंग्रह १९७१ साली प्रकाशित झाला. या कथासंग्रहातील एकूणच कथा मनाचा ठाव घेणाऱ्या आहेत. हा कथासंग्रह पाच कथांच्या साथीने आकाराला आला असून यातील सर्वच कथा वाङ्मयीनदृष्ट्या सरस आहेत. 'अर्धूक', 'सती', 'त्याला मिळाला वनमाळी', 'प्रवास' आणि 'अखेरची रात्र' या सर्वच कथा वेगवेगळ्या विषयावर आधारलेल्या आहेत. या कथांच्या विषयांना एक वेगळी वाङ्मयीन उंची कथाकार पुंडलिकांनी दिली आहे. 'अर्धूक' ही कथा एका सामाजिक वास्तवाचे दर्शन घडविते. त्यामुळे या कथेला एक वेगळी उंची प्राप्त झाली आहे. यातील 'सती'ही कथा काकाजी या व्यक्तिरेखेची वाङ्मीयन भूमिकेतून मांडणी करते. या कथेतील लेखकाच्या कलात्मक दृष्टीचा आणि वाङ्मयीन स्वातंत्र्याचा विचार काही वाचकांकडून झाला नाही. त्यामुळे ती वादाच्या भोवऱ्यात सापडली होती. वास्तविक पाहता ही कथा एक कलाकृती म्हणून उत्तमच आहे. अशा बहुविध विषयाचा वेध या कथासंग्रहातून घेण्यात आला आहे. 'त्याला मिळाला वनमाळी' ही कथा कलेचा उत्तम दाखला देता येईल एवढी संपन्न आहे. पुंडलिकांच्या कथा लेखनातील मृत्यूचे बहुविध रुप रेखाटन हे महत्वाचे वैशिष्ट्य या कथेतून रेखाटले आहे. या कथेतील बुवांच्या वाट्याला आलेली दुर्देवी स्थिती या कथेच्या शेवटच्या भागात मांडली आहे. ती अशी, "शिवरामबुवांची जीभ अरळली, अडखळली हनुवटी अर्धवट उचकटून तिरकीच्या तिरकी झाली. धडपडत वेड्या वाकड्या अंगानं ते खाली कोसळलं.

बुवांच्या डाव्या हाताची बोटं फरशीवर थरथरत होती. डावा डोळा बारीक होऊन उघडझाप करीत होता. उजवा डोळा विलक्षण वटारलेला होता. कोरडी लुळी जीभ मात्र एकेका शब्दासाठी मागंपुढं होत होती."[5] अशा प्रसंगातून मृत्यूच्या एका वेगळ्या रुपाचे दर्शन पुंडलीक घडवतात. ही कथा शिवरामबुवाच्या आयुष्याचा वेध घेतेच. पण एकूणच वयोवृध्दांच्या शेवटच्या आयुष्याचा वेध घेते. आपल्या एकूणच कथा वाङ्मयाच्या माध्यमातून पुंडलिकांनी बालके आणि वृध्द मंडळी यांच्या आयुष्यातील घटनांचा कलात्मक वेध घेतला आहे. अशा संपन्न कथाकारांच्या कथा वाङ्मयाविषयी चंद्रकांत बांदिवडेकर विवेचन करतात, "जन्म, मृत्यू, माणूस व नियती यांचे संबंध निरनिराळ्या राजकीय विचारसरणीच्या तळाशी असलेली मानसिकता, याकडे प्रश्नाकुल दृष्टीने ही कथा पहाते. अध्यात्मिक प्रेरणांच्या मुळाशी असलेल्या ऐहिक अतृप्तीचा... पुंडलिकांतील कथाकाराचे एक महत्वाचे वैशिष्ट्य असे की ते सर्व गोष्टींकडे कलाकाराच्या तन्मयतेने पहातात व म्हणूनच त्यांची कथा कधीच थंड व कोरडी वाटत नाही."[6] यावरून पुंडलिकांच्या कथालेखनाच्या सामर्थ्याचा परिचय घडतो. त्यांची कथा समाजातील प्रखर वास्तवाला बोलके करणारी आहे. त्यांच्या लेखन शैलीला एका वेगळ्या वाङ्मयीन सौंदर्याची धार आहे. त्यामुळे त्यांच्या एकूणच कथा साहित्य सौंदर्याच्या उंचीवर पोहोचल्या आहेत. त्यांच्या या शैलीदार कथा वाङ्मयाचा एक वेगळा वाचक वर्ग आहे. तो पुंडलिकांच्या कथा वाङ्मयाच्या प्रेमात आगदी अखंडपणे बुडालेला असतो.

कथा लेखनाच्या माध्यमातून पुंडलिकांनी मराठी साहित्य समृध्द केले. त्यांची कथा ही मध्यमवर्गीय वास्तवाचा पट उलगडून दाखविले त्यात वेगवेगळ्या वयोगटाची माणसे ते व्यक्तिरेखांच्या माध्यमातून उभी करतात. असा त्यांचा चौथा आणि शेवटचा कथासंग्रह 'माळ' हा १९८० साली प्रकाशित झला. या कथासंग्रहात एकूण अकरा कथा समाविष्ट आहेत. या कथा समाजातील वेगवेगळ्या विषयाचा वेध घेतात. 'माळ', 'गाय', 'लांडगा आला रे आला', 'जेव्हा पहाट होते' आणि 'अपार' या कथा ज्येष्ठ आणि वयोवृध्द माणसांच्या आयुष्याचा वेध घेणाऱ्या कथा आहेत. या कथा प्रामुख्याने आयुष्याच्या उत्तरार्धाकडे वाटचाल करणाऱ्या माणसांच्या मानसिकतेचा वेध घेतात. यात 'माळ' ही कथा विशेषतः उल्लेखनीय आहे. या कथेतून केसकर मास्तर आणि काशीताई या वयोवृध्द व्यक्तींच्या आयुष्याचा वेध घेतला आहे. या वयातील माणसांचे जगणे कसे वेगळ्या वळणावरून वाटचाल करीत असते, हे या कथेवरून लक्षात येते. "दोघांनीही आपले हात जोडले. मास्तरांनी काशीताईचा हात हातात घेतला. काशीताईंनी तो घट्ट पकडला. गर्दीच्या लोंढ्यातून,

चेंगराचेंगरीतून, धक्काबुक्कीतून दोघं चालली होती. मास्तर काशीताईकडे पहात नव्हते. काशीताई मास्तरकडे पाहात नव्हत्या. त्यांच्या डोळ्यातून फक्त पाणी वाहात होतं. मास्तर मधूनच म्हणत होते, "काशीताई, जपून हं, जपून - हळू हं.""[७] ही वयोवृध्द माणसांच्या आयुष्यातील वेगळी आगतिकता पुंडलीक मांडतात. या माणसांच्या जगण्यातील सूक्ष्म संदर्भ अगदी हळूवारपणे आपल्या कथाच्या माध्यमातून कथकार रेखाटतात. या संग्रहातील 'शेवटी ऽऽ काय!', 'बोलावणं', 'माझी झोपडी', 'एलिमेंटरी, माय डिअर होम्स', 'कोनाडा' आणि 'बंट्या' या कथा बहुविध विषयावर आधरीत अशा कथा आहेत. या कथा लेखनातील लेखन सामर्थ्यावरून पुंडलिकांच्या कथा वाङ्मयाची वाङ्मयीन उंची निदर्शनास येते. पुंडलिकांच्या कथांमधून साकार झालेल्या माणसाविषयी इंदुमती शेवडे म्हणतात, "पुंडलिकांचे स्वतःचे असे एक विश्व आहे. ते सोज्वळ आहे. त्याला आशेची किनार आहे. त्यातील लहानमोठी माणसे ध्येयवादी, पापपुण्याचा विचार करणारी चाकोरीत राहणारी पण त्याबाहेर पडण्याची धडपड करणारी, संयमी व निष्ठावान आहेत."[८] यावरून पुंडलिकांच्या कथाविश्वाची वेगळी ओळख समोर येते. त्यांच्या कथा वाङ्मयातून साकार झालेली माणसे आपल्या 'स्व' अस्तित्वासाठी धडपडताना दिसतात. ही माणसे सर्वच वयोगटातील आहेत. या एकूणच माणसांच्या आयुष्यातील संघर्षमय वाटचाल टिपताना पुंडलीक या माणसांचे सर्वच पैलू कलात्मकपणे रेखाटतात. एकूणच पुंडलिकांचे कथात्मक लेखन हे खूप विस्तृत आहे. या लेखनाला येथे संक्षिप्तपणे स्वरुपात मांडले आहे. त्यांच्या कथा लेखनाची मांडणी वेगवेगळ्या अंगाने करता येईल. अशी या विषयाची व्याप्ती भव्य आहे.

**समारोप :-**

मराठी कथा वाङ्मय समृध्द करणारे लेखक विद्याधर पुंडलीक यांच्या एकूणच कथांचा अभ्यास या निमित्ताने केला आहे. त्यांचे 'पोपटी चौकट', 'टेकडीवरचे पीस', 'देवचाफा' आणि 'माळ' हे चार संपन्न कथासंग्रह येथे अभ्यासण्यात आले आहेत. या कथासंग्रहातील बालजगत, वयोवृध्दाचे विश्व, मत्यूचे विविध रुपे, मांजर प्रेम आणि एकूण प्रेमविषयक मांडणी यांचा वेध या ठिकाणी घेतला गेला आहे. या एकूणच विवेचक अभ्यासातून काही निष्कर्ष हाती लागले. याची मांडणी पुढीलप्रमाणे केली आहे.

**निष्कर्ष :-**

१) विद्याधर पुंडलिकांचे कथालेखन हे प्रयोगशील आणि नवनवीन विषय सक्षमपणे साकार करणारे आहे.
२) विद्याधर पुंडलिकांच्या बहुसंख्य कथा ह्या बालकांच्या मनोविश्वाचे तटस्थपणे दर्शन घडविणाऱ्या आहेत.
३) आपल्या सभोवतीला असलेल्या समाजवास्तवाचे चित्र साकार करण्यात कथाकार म्हणून विद्याधर पुंडलीक यशस्वी ठरले आहेत.
४) वयोवृध्द माणसे आणि मृत्यूची बहुविध रुपे नेमक्या शैलीतून विद्याधर पुंडलिकांनी रेखाटले आहेत.
५) मांजर प्रेम आणि मानवी आयुष्यावर आधरित एकवेगळा प्रेमभाव विद्याधर पुंडलिकांनी आपल्या कथेतून उभा केला आहे.

**संदर्भ सूची :-**

१. विद्याधर पुंडलीक, पोपटी चौकट, मौज प्रकाशन गृह, मुंबई, आठवी आवृत्ती : मार्च २०१२, पृ.क्र.८७
२. रागिणी वि.पुंडलीक, साथसंगत, मौज प्रकाशन गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती : १ ऑगस्ट २००८, पृ.क्र.२७-२८
३. विद्याधर पुंडलीक, टेकडीवरचे पीस, सुवर्ण प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी : १९८३, पृ.क्र.१४२
४. म.द.हातकणंगलेकर, मराठी कथा : रुप आणि परिसर, सुवर्ण प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती : मार्च १९८६, पृ.क्र.२३
५. विद्याधर पुंडलीक, देवचाफा, मौज प्रकाशन गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती : फेब्रुवारी २०१०, पृ.क्र.७७
६. चंद्रकांत बांदिवडेकर, कथा, मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरुप (१९५०-१९७५) (संपा.गो.मा.पवार, म.द.हातकणंगलेकर) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती : १९८६/१९०७, पृ.क्र.१७१
७. विद्याधर पुंडलीक, माळ, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती : फेब्रुवारी २००७, पृ.क्र.१३
८. इंदुमती शेवडे, मराठी कथा उगम आणि विकास, सोमैय्या पब्लिकेशन्स, मुंबई, सं.सु.आवृत्ती : १९८२, पृ.क्र.४९४